श्री. यादव, ५७४८
धनर
प्रिंसि.
११.०४.२०२५

URC कडे वर्ग करून
एक copy संबंधित
नस्तीस जोडवे

११ ... २०२५

**सुधारीत मंजूर प्रादेशिक योजना, जालना**
महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम २०(४) अन्वये अधिसूचना निर्गमित करण्याबाबत.
मौ.देवमूर्ती,ता. व जि. जालना येथील गट क्र. १७ व १८ (भाग) ह्या जमीनी मधील १५ मी. रुंद प्रा.यो.रस्त्याखालील क्षेत्र वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणेबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर**
**एम.बी.सी.टॉवर, दुसरा मजला, बाबा पेट्रोल पंपा जवळ, अदालत रोड, औरंगाबाद - ४३१००१**

**निर्णय :- क्र./ प्र.छा.स./प्रा.यो.जालना/कलम-२०(४)/मौ.देवमूर्ती,ता.जि.जालना/गट क्र.१७ व १८/सहसंनरछसं/** ५८८
दिनांक ०२.०४.२०२५

**निर्णय** :- सोबतची अधिसूचना(मराठी/इंग्रजी) महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

(न. भा. नागरगोजे)
सदस्य सचिव, प्रस्ताव छाननी समिती,
तथा
सहसंचालक, नगर रचना,
छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर

प्रति,

१) मा. अप्पर मुख्यसचिव, नगर विकास विभाग, (नवि-३०), मंत्रालय ,मुंबई
२) मा.विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर तथा मा.अध्यक्ष, प्रस्ताव छाननी समिती, छत्रपती संभाजीनगर
३) मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे
(यांस विनंती करण्यात येते की, सदरची अधिसूचना नगर रचना संचालनालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यासाठी कृपया संबंधीतांना निर्देश द्यावेत)
४) जिल्हाधिकारी, जालना
५) सहाय्यक संचालक, नगर रचना, जालना शाखा, जालना
(प्रस्तूत प्रकरणी छाननी समितीच्या उक्त निर्णयानुसार अधिप्रमाणित करावयाच्या भाग नकाशाच्या ०६ प्रती त्वरीत सादर कराव्यात)
६) व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, छत्रपती संभाजीनगर
/- त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची अधिसुचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात औरंगाबाद विभागीय पुरवणी भाग-१ मध्ये प्रसिध्द करण्यात येऊन त्याच्या प्रत्येकी ०५ प्रती या विभागास, १)संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे २)सहसंचालक, नगर रचना, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर ३)सहायक संचालक, नगर रचना, जालना शाखा, जालना व ४) जिल्हाधिकारी, जालना यांना पाठवाव्यात.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
सहसंचालक नगर रचना, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर, यांचे कार्यालय
एम.बी.सी.टॉवर,दुसरा मजला,बाबा पेट्रोल पंप जवळ, अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर

**अधिसूचना**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ :**
**क्रमांक:प्र.छा.स./प्रा.यो.जालना/कलम-20(4)/मौ.देवमूर्ती,ता.जि.जालना/गट क्र.17 व 18/सहसंनरछसं/** ५४४
दिनांक :०२ .04.2024

ज्याअर्थी, जालना जिल्ह्याची सुधारीत प्रादेशिक योजना (यापुढे ज्यास "उक्त प्रादेशिक योजना" असे संबोधले आहे), महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 (सन 1966 चा महाराष्ट्र अधिनियम 37 वा) (यापुढे ज्यास "उक्त अधिनियम" असे उल्लेखिलेला आहे), चे कलम 15 अन्वये, शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-2916/प्र.क्र.267/2016/नवि-30, दि. 02 जानेवारी, 2018 अन्वये मंजूर झाली असून ती दि. 02 मार्च, 2018 पासून अंमलात आली आहे. (यापुढे ज्यास "उक्त प्रादेशिक योजना" असे उल्लेखिलेला आहे.);

आणि ज्याअर्थी, उक्त प्रादेशिक योजनेतील प्रस्तावानुसार, मौ. देवमूर्ती, ता. जि.जालना येथील गट क्र. 13,14,17,18,19,20,33,34,41,52 व 53 मधून 15.0 मी. रूंद रस्ता प्रस्तावित आहे (यापूढे ज्यास “उक्त क्षेत्र” असे उल्लेखिलेला आहे);

आणि ज्याअर्थी, राज्यात मंजूर असलेल्या प्रादेशिक योजनांमध्ये उक्त अधिनियमाचे कलम-20 अन्वये वेळोवेळी कराव्या लागणा-या जमीन वापराच्या फेरबदलांसाठी करावयाच्या कार्यपध्दतीबाबत उक्त अधिनियमाचे कलम-154 अन्वये शासन निर्णय क्र.टिपीएस-1815/प्र.क्र.49/15/नवि-13, दि.06.05.2015 व शासन निर्णय क्र. टिपीएस-1815/प्र.क्र.49/15/नवि-13, दि. 04.01.2016 अन्वये शासनाने निर्देश दिलेले आहेत (यापुढे ज्यास " उक्त शासन निर्णय" असे उल्लेखिलेला आहे), व त्या अनुषंगाने शासनाने "प्रस्ताव छाननी समिती" गठीत केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त क्षेत्र रद्द करुन त्या खालील जागा रहिवास विभागात समाविष्ट करणे आवश्यक असल्याचे "प्रस्ताव छाननी समिती" चे मत झाले होते. व त्यानुसार, उक्त अधिनियमाचे कलम 20 चे उप कलम (2) मधील तरतूदीनुसार, उक्त क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्याकरीता उक्त प्रादेशिक योजना सुधारीत करणे आवश्यक होते. (यापुढे ज्यास " उक्त फेरबदल" असे उल्लेखिलेला आहे.)

आणि ज्याअर्थी, शासनाने उक्त अधिनियमाचे कलम 151 पोटकलम (1) अन्वये निर्णय क्र. टिपीएस-1815/प्र.क्र. 49/15/नवि-13, दि. 11.6.2015 नुसार कलम 20(2), कलम 20(3) व कलम 20(4) खालील अधिकार विभागीय सहसंचालक, नगर रचना, यांना प्रदान केलेले आहेत;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम 20 चे पोटकलम (3) च्या तरतूदीनुसार सहसंचालक, नगर रचना, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी सूचना व निर्णय क्र. प्र.छा.स./प्रा.यो.जालना/कलम-20(3)/मौ. देवमूर्ती, ता.जालना/ 15 मी. रस्ता/सहसंनरऔ/1661, दिनांक 14 ऑक्टोंबर, 2021 अन्वये नागरीकांच्या हरकती / सुचना मागविण्या साठीची नोटीस महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक औरंगाबाद विभागीय पुरवणी दि. 21-27 ऑक्टोंबर, 2021 रोजी पृष्ट क्र. 850 ते 851 वर व दैनिक पार्श्वभूमी, दि.19.10.2021, दैनिक लोकमत टाईम्स

दि.20.10.2021 रोजी प्रसिद्ध केली आहे व उक्त प्रस्तावित फेरबदलाबाबत सर्व संबंधीतांकडून विहित मुदतीत सूचना / हरकती दाखल करणा-यांना सुनावणी देण्याकरीता व त्यावरील अहवाल सदस्य सचिव यांना सादर करण्यासाठी सहायक संचालक, नगर रचना, शाखा जालना यांना "अधिकारी" म्हणून प्राधिकृत करण्यात आले होते. (यापुढे "उक्त अधिकारी" असे उल्लेखिलेला आहे.);

आणि ज्याअर्थी, उक्त कलम-20 (3) च्या सूचनेच्या अनुषंगाने उक्त अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना, जालना शाखा यांनी वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन त्यांचा अहवाल सदस्य सचिव यांचेकडे सादर केला आहे;

आणि ज्याअर्थी, सदर प्रकरणी प्रस्ताव छाननी समितीची बैठक दि.07.12.2021 रोजी झालेली असून, त्यात सहायक संचालक, नगर रचना, जालना शाखा यांचेकडून पत्र क्र.1527, दि.22.11.2021अन्वये अभिप्राय प्राप्त झालेला आहे. तसेच कलम-20(3) ची सूचना स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाले बाबतची देयकाची रक्कम संबंधितांकडून शासकीय कोषागारात भरणा केल्यानंतर व सदर फेरबदलाच्या अनुषंगाने उक्त रस्त्याने बाधित होणा-या जमिनीच्या जमिन मालकाकडून एकाच वेळी अधिमूल्याच्या रकमा भरणेसंदर्भात कार्यवाही न झाल्यास ज्या जमिन मालकांकडून कमाल 1 वर्षाच्या कालावधीत अधिमूल्याच्या रकमा जमा केल्या जातील त्या जमिन मालकांचे क्षेत्रपरत्वे रस्त्याची सलगता विचारात घेवून टप्प्या टप्प्याने सदस्य सचिव यांनी कलम 20(4) अन्वयेची अंतिम अधिसूचना निर्गमित करणेची कार्यवाही करण्यास मान्यता देण्याचा निर्णय प्रस्ताव छाननी समितीने घेतला आहे;

आणि ज्याअर्थी, अर्जदार यांनी वृत्तपत्र प्रसिध्दी बाबतची रक्कम व गट क्र.13 व 14 करिता जमीन वापर बदलाचे अनुषंगाने अधिमूल्याची रक्कम शासकीय कोषागारात भरणा केली आहे. त्यानूषंगाने, केवळ गट क्र.13 व 14 मधुन 15 मी. रुंद प्रादेशिक योजना रस्ता त्याखालील क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करणेच्या अनुषंगाने दि. 24.01.2022 चे उक्त अधिनियमाचे कलम 20 (4) अन्वये अधिसुचना निर्गमित करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, गट क्र.17 व 18 मधील अर्जदार यांनी कलम 20 (4) नुसार सदर गटांमधुन 15 मी. रुंद प्रादेशिक योजना रस्ता रद्द करणेच्या अनुषंगाने आवश्यक ते अधिमुल्य भरणा करणेची तयारी दर्शविलेली आहे. आणि त्यानूषंगाने सदर प्रकरणी प्रस्ताव छाननी समितीची बैठक दि.12.03.2025 रोजी पार पडलेली असुन, या बैठकीमध्ये दि. 04.10.2021 रोजीचे कलम 20 (3) च्या सूचनेमध्ये नमुद " सदर अधिसुचना प्रसिद्ध झालेपासुन 1 वर्षाचे आत बाधित होणा-या जागेचे अधीमूल्य व इतर विहित शुल्क भरणा करणे आवश्यक आहे." ही अट क्र. 02 शिथील करण्यात येऊन,अर्जदार यांनी चालु वार्षिक मूल्यदर तक्त्यानुसार अधिमुल्याचा भरणा केल्यानंतर सदस्य सचिव यांनी कलम 20(4) अन्वयेची अंतिम अधिसूचना निर्गमित करणेची कार्यवाही करण्यास मान्यता देण्याचा निर्णय प्रस्ताव छाननी समितीच्या उक्त नमुद बैठीमध्ये घेण्यात आलेला आहे;

आणि ज्याअर्थी, गट क्र. 17 व गट क्र.18 जमीन वापर बदलाचे अनुषंगाने संबंधित जमिन मालकांनी अधिमूल्याची रक्कम शासकीय कोषागारात भरणा केली आहे.

आता, त्याअर्थी याबाबतीत शासनाने दि.11.06.2015 चे अधिसूचनेन्वये प्रदान केलेल्या उक्त अधिकारानुसार, उक्त अधिनियमाच्या कलम 20 पोट कलम (4) अन्वये सहसंचालक, नगर रचना, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर उक्त फेरबदलास खालीलप्रमाणे मंजुरी देत आहे आणि त्यासाठी उक्त प्रादेशिक योजना मंजुरीच्या दि.02 मार्च, 2018 च्या अधिसूचनेसोबत जोडलेल्या फेरबदलांच्या अनुसूचीतील शेवटच्या नोंदीनंतर खालील प्रमाणे बदलाची नोंदीचा समावेश करण्यात येत आहे :-

## <u>नोंद</u>

जालना मंजूर सुधारीत प्रादेशिक योजनेतील मौ.देवमूर्ती, ता. व जि. जालना येथील गट क्र. 17 व गट क्र.18 मधुन प्रस्तावित 15 मी. रुंद प्रादेशिक योजना रस्ता सोबतच्या नकाशात दर्शविल्यानुसार वगळून त्याखालील क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करणे, असा बदलण्यात येत आहे.

उक्त मंजूर फेरबदल दर्शविणारा नकाशा नागरिकांच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात कामाकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहील.

1) जिल्हाधिकारी, जालना
2) सहायक संचालक, नगर रचना, जालना शाखा जालना

सदर फेरबदलाची अधिसूचना <u>www.dtp.maharashtra.gov.in</u> या संकेतस्थळावर सुध्दा उपलब्ध आहे.

(न. भा. नागरगोजे)
सदस्य सचिव, प्रस्ताव छाननी समिती,
तथा
सहसंचालक, नगर रचना,
छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर

**Government of Maharashtra**
**Urban Development Department**
Office of the Joint Director of Town Planning, Chhatrapati Sambhajinagar Division,
Chhatrapati Sambhajinagar
MBC Tower. Second Floor,Near Baba Petrol Pump,Adalat Road, Chhatrapati Sambhajinagar-431001

## **-: NOTIFICATION :-**

**The Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.**
No.P.S.C./R.P.Jalna/Section-20(4)/Mauze Devmurti, Tal. & Dist.Jalna/Gut No.17 & 18 /JDTP-CSN/ 588
Dt.02/04/2025.

Whereas, the Revised Regional Plan of Jalna District (hereinafter referred to as " the said Regional Plan") has been sanctioned by the Government vide Urban Development Department's Notification No. TPS-2916/CR-267/2016/UD-30, dated 02nd Jan, 2018 under section 15 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act. No. XXXVII of 1966 ) (hereinafter referred to as " the said Act") and has come into force with effect from the 02nd March, 2018;

And whereas, as per the proposals of the said Regional Plan, the land bearing 15.0 m. road passing through Gut No.13,14,17,18,19,20,33,34,41,52 and 53 of Mauze Devmurti Tq.Jalna (hereinafter referred to as "the said Area");

And whereas, the Government vide Resolution No. TPS-1815/CR49/15/UD-13/ Dt. 06.05.2015 and Resolution No. TPS-1815/CR49/15/UD-13/ Dt. 04.01.2016 (hereinafter referred to as "the said Government Resolution") has issued the directives under section 154 of the said Act, regarding the procedure to be followed under section 20 of the said Act, for making changes in the use of land in the areas of sanctioned Regional Plans, and for that purpose constituted "Proposal Scrutiny Committee".

And whereas, the "Proposal Scrutiny Committee" constituted under the said Government Resolution, was of the opinion that, the said area included in Regional Plan should be deleted and included in Residential Zone and accordingly it was necessary to modify the said Regional Plan (hereinafter referred to as " the said modification") in accordance with the provisions of sub-sections (2) of section 20 of the said Act, subject to some conditions;

And whereas, as per the provision of sub section (1) of section 151 of the said Act, Government vide notification No.TPS-1815/CR-49/15/UD-13, dt.11/6/2015 has delegated the powers under section 20(2), section 20(3) & section 20(4) of the said Act to the concerned Joint Director of Town Planning.

And whereas, in pursuant to the above, a notice bearing No. P.S.C./R.P. Jalna/Section-20(3)/Mauze Davmurti,Tq.Jalna/15mt.road/JDTP-Abad/1661, Dt.04/10/2021 regarding the proposed said modification under sub-section (3) of the section 20 of the said Act, was published by the Joint Director of Town Planning, Aurangabad Division, Aurangabad which appeared in the Maharashtra Govt. Gazette, part-1 Aurangabad Division Supplement dated October 21-27, 2021 on page no. 850 to 851 and Daily Parshvbhumi Dt.19.10.2021, Daily Lokmat Times Dt.20.10.2021for inviting suggestions and / or objections from the general public and the Assistant Director of Town Planning, Jalna Branch, Jalna was authorized as the Officer (hereinafter referred to as "the said Officer") to hear the suggestions and / or objections and submit his report to the Member Secretary ;

And whereas, the said officer i.e. Assistant Director of Town Planning, Jalna Branch, Jalna has completed all the legal formalities as mentioned in notice published U/s 20 (3) and submitted his report to the Member Secretary;

And whereas, the proposal scrutiny committee meeting held on Dt. 07.12.2021 & the committee accorded approval to this proposal, After the receipt of report from Assistant Director of Town Planning, Jalna Branch vide letter no. 1527, dt. 22.11.2021 and land owner should deposit the premium as mentioned in Government Resolution 04.01.2016 and other specified charges into the Govt. Treasury, within one year from the publication of notice and the final notification u/s 20(4) will be issued for the land owners who will deposit the premium and charges by considering the continuity of said area and directed member Secretary to issue final notification U/s 20 (4) in this regard thereafter;

And whereas, as per the Zone Change Policy the applicants had already deposited the newspaper publication fees and also Zone Change Premium amount for Gut No. 13 and 14 to the Government Treasury. Accordingly, the 15 m. wide regional plan road passing through Gut No. 13 and 14 is deleted and included in the residential zone. vide Notification dated 24.01.2022 under Section 20 (4) of the said Act.

Accordingly, the meeting of the Proposal Scrutiny Committee is held on dt.12.03.2025, and Committee accorded approval to the relaxation in the condition no. 2 i.e. , "The owner of the land should deposit the premium and other specified charges within one year from publication of this notification", mentioned in the notification under section 20 (3) dated 04.10.2021." and directed Member Secretary to issue final notification u/s 20 (4) of the said Act, after applicant deposits the zone change premium as per the Annual Statement of Rates of Current year in this regard;

And whereas, the applicants of gut no. 17 and 18 have deposited the zone change premium amount into the government treasury;

Now, therefore, in exercise of powers delegated by Govt. vide notification Dt. 11.06.2015; under sub-section (4) of section 20 of the Act, Joint Director of Town Planning, Chhatrapati Sambhajinagar Division, Chhatrapati Sambhajinagar hereby sanctions the said modification and for that purpose amends the aforesaid Notification dated, 02nd January 2018, as follows; In the said Sanctioned Regional Plan, the following new entry shall be added after the last entry of the Schedule of Modifications.:-

**ENTRY**

In the Sanctioned Revised Regional Plan of Jalna , the proposed 15.00 m. wide Regional plan road passing throgh land bearing Gut No.17 to Gut No. 18 of Mauza Devmurti Tq. Jalna Dist. Jalna is deleted and included in Residential Zone as shown on the plan,

The Part plan showing the above said Sanctioned Modification shall be kept open for information of the general public during office hours on all working days at the following offices-

1) The Collector, Jalna.
2) The Assistant Director of Town Planning, Jalna Branch, Jalna.

This Notification shall also be available on website www.dtp.maharashtra.gov.in.

(N.B.Nagargoje)
Member Secretary,
Proposal Scrutiny Committee
and
Joint Director, Town Planning,
Chhatrapati Sambhajinagar Division, Chhatrapati Sambhajinagar